आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२६ ऑगस्ट  २०२६ - बुधवार

**ठळक बातम्या**

- देशभरात आज ईद-ए-मिलाद-उन-नबीचा उत्साह, राज्यातही ईद साजरी

- राज्यातल्या गरोदर मातांसाठी तीव्र रक्तक्षयावरच्या मोफत उपचारांना गती

- राज्य लोकसेवा आयोगाकडून अन्न आणि औषध प्रशासन विभागातल्या औषध निरीक्षक पदाची भर्ती प्रक्रिया रद्द

**आणि**

- कोलंबोमध्ये सुरू असलेल्या दुसऱ्या क्रिकेट कसोटी सामन्यात भारताचा श्रीलंकेला फॉलो ऑन

**<><><><><>**

देशभरात ईद-ए-मिलाद-उन-नबी आज साजरी होत आहे. यानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. ईद-ए-मिलाद-उन-नबीचा सण हा मोहम्मद पैगंबर यांच्या शिकवणींचं स्मरण करण्याचा दिवस आहे. त्यांची शिकवण आपल्याला सदाचार आणि कर्तव्यनिष्ठेच्या मार्गाचे अनुसरण करण्यास प्रेरित करते. मोहम्मद पैगंबर यांचे उदात्त आदर्श आपल्याला एक सर्वसमावेशक आणि विकसित भारत घडवण्यासाठी सक्रियपणे योगदान देण्यास प्रेरित करत राहोत, असं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

हा सण सर्वांच्या जीवनात सुखशांती, समृद्धी घेऊन येवो, असं उपराष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.  हा पवित्र दिवस आपल्या समाजात एकोपा, आनंद आणि बंधुभाव अधिक दृढ करो. दया, माणुसकी आणि समाजासाठी योगदान देण्याची भावना आपल्याला सदैव मार्गदर्शित करो, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.

केरळममध्ये साजऱ्या होणाऱ्या ओणम सणाच्याही राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि प्रधानमंत्र्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

इस्लामचे संस्थापक हजरत मोहम्मद पैगंबरांची पंधराशेवी जयंती **अकोल्यात** जल्लोषात साजरी होत आहे. अकोल्यात काल ईद-ए-मिलादनिमित्त पारंपरिक जुलूस-ए-मोहम्मदी उत्साहात काढण्यात आला. सकाळी ११ वाजता फतेह चौकातून सुरु झालेली मिरवणूक सायंकाळी ५ वाजता मोठ्या मशिदीजवळ संपली. या मिरवुणकीत सुमारे ३० हजार मुस्लिम बांधवांनी सहभाग घेतला. पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

**जळगाव** शहरात ईद-ए-मिलादनिमित्त भव्य रॅली काढण्यात आली. शहरातल्या विविध भागात मिरवणुकीच्या निमित्तानं मुस्लिम बांधव एकत्र आले होते. भिलपूरा पोलीस चौकीजवळ जिल्हा पोलीस दलातर्फे मुस्लिम बांधवांना गुलाबपुष्प भेट देत शुभेच्छा देण्यात आल्या. ढोल-ताशे आणि डिजेच्या तालावर हातात झेंडा घेवून तरुण मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते.

**यवतमाळ**मधल्या मुस्लिम बांधवांनी उत्साह आणि जल्लोषात ईद-ए-मिलाद-उन-नबी साजरी केली. यानिमित्तानं धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं. कळंब चौकातून मोठी मिरवणूक काढण्यात आली. मुस्लिम समाज संघटनांनी सामाजिक कार्यात सहभाग घेतला. अनेक ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आलं, रक्तदान शिबिरं आयोजित करण्यात आली आणि गरजू लोकांना धान्याचं वाटपही करण्यात आलं.

**<><><><><>**

गेल्यावर्षी जून ते ऑक्टोबर दरम्यान सरासरीपेक्षा अधिक झालेला पाऊस आणि वादळी वाऱ्याने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना राज्य सरकारनं ८६ कोटी ६५ लाख रुपयांची मदत मंजूर केली आहे. नाशिक, अहिल्यानगर आणि जळगाव जिल्ह्यातल्या पात्र शेतकऱ्यांना ही मदत मिळणार आहे.

**<><><><><>**

राज्यातल्या गरोदर मातांचं आरोग्य अधिक सक्षम करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागानं तीव्र रक्तक्षयावरच्या मोफत उपचारांना गती दिली आहे.

भारतात अंदाजे ५२ टक्के गर्भवती महिलांमध्ये रक्तक्षय आढळून येतो. तीव्र रक्तक्षय हे माता आणि नवजात शिशु मृत्यूचं एक महत्त्वाचं कारण आहे. त्यामुळे तीव्र रक्तक्षयावर राज्यातल्या शासकीय आरोग्य संस्थांमध्ये आयर्न सुक्रोज तसेच एफसीएम, म्हणजे फेरीक कार्बोक्सी माल्टोज या औषधांद्वारे शिरेवाटे उपचार सुविधा उपलब्ध करून दिली आहे. चालू

वर्षात नोंद झालेल्या एकूण मातांपैकी, तपासणीअंती २३ हजार ५२४ गरोदर मातांचं निदान, तीव्र रक्तक्षय असलेल्या अतिजोखमीच्या माता म्हणून झालं आहे. त्यापैकी २१ हजार ३३७ मातांना हे उपचार दिले असून, उपचाराचं प्रमाण ९१ टक्क्यांवर पोहोचलं आहे.

अहिल्यानगर, लातूर, बीड, चंद्रपूर, वर्धा, रत्नागिरी, वाशिम आणि बुलढाणा या जिल्ह्यांमधे हे प्रमाण १०० टक्के आहे. तर महानगरपालिका क्षेत्रात लातूर, नाशिक, भिवंडी, कोल्हापूर, उल्हासनगर, नांदेड-वाघाळा, नवी मुंबई, सोलापूर, चंद्रपूर, परभणी आणि सांगली-मिरज कुपवाड या क्षेत्रांमध्ये उपचारांचं प्रमाण १०० टक्के आहे.

**<><><><><>**

मराठा समाजाच्या मागण्यांसंदर्भात सरकार सकारात्मक असून सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्याकडील मराठा समाजाच्या संबंधी प्रलंबित विषयांवर तातडीने कार्यवाही करावी, असे निर्देश मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले. मराठा समाजाशी संबंधीत विविध विषयांबाबत आढावा बैठकीनंतर काल ते मुंबईत बोलत होते.

कुणबी जात प्रमाणपत्र आणि जात पडताळणी प्रमाणपत्र वितरणाच्या कामकाजाचा आढावा त्यांनी घेतला. ही प्रमाणपत्रे विहीत मुदतीत देण्यात यावीत असे निर्देश त्यांनी दिले. तसंच विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांनी या कामकाजाचा आढावा घ्यावा असं विखे पाटील यांनी बैठकीत सांगितलं. मराठा आरक्षण आंदोलनात बलिदान दिलेल्या व्यक्तींच्या वारसांना शासन सेवेमध्ये नियुक्ती देण्याबाबत तातडीने कार्यवाही करावी, महावितरण भरती प्रक्रियेतल्या प्रतिक्षायादीवरच्या उमेदवारांना नियुक्ती देण्याच्या मागणीवर तपासून कार्यवाही करावी, अधिसंख्य पदावर नियुक्ती दिलेल्या उमेदवारांचे शासन सेवेत कायमस्वरुपी समावेशन करण्याच्या प्रस्तावावर तातडीने कार्यवाही करावी, अशा सूचनाही त्यांनी केल्या.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगानं अन्न आणि औषध प्रशासन विभागाची औषध निरीक्षक गट-ब या पदासाठी सध्याची भर्ती प्रक्रिया रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यातल्या ६ विभागीय मुख्यालयांच्या ठिकाणी परीक्षा केंद्रांवर २२ मार्च २०२६ ला चाळणी परीक्षा झाली. मात्र यात गैरप्रकार झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यावर आयोगानं केलेल्या तक्रारीच्या आधारे करण्यात आलेल्या पोलीस तपासात एका उमेदवाराला लाभ झाल्याचं

प्रथमदर्शनी दिसून आलं. या पार्श्वभूमीवर आयोगानं काल प्रसिद्धीपत्रकाद्वारे परीक्षा रद्द करण्याचा निर्णय जाहीर केला. या पदासाठी लवकरच फेरपरीक्षा घेतली जाईल, त्यासाठी संबंधित उमेदवारांना पुन्हा अर्ज करण्याची गरज नाही, तसेच यासाठी कोणतेही परीक्षा शुल्क आकारलं जाणार नाही, अशी माहिती आयोगानं दिली आहे.

<><><><>

इंडियन इन्स्टिट्युट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजीमध्ये शिकणाऱ्या १०० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय नेटफ्लिक्सनं घेतला आहे. या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्कात ८० टक्क्यांपर्यंत मदत दिली जाणार आहे. १ वर्ष कालावधीचे २ पदविका अभ्यासक्रम आणि ६ महिने कालावधीच्या ४ प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळेल.

<><><><>

भारतीय ग्रँडमास्टर आर प्रज्ञानंद यानं जी सी टी बुद्धिबळ स्पर्धेत जर्मनीच्या व्हिन्सेंट कीमर याचा १९-९ असा पराभव करून अंतिम फेरीच्या शेवटच्या टप्प्यात प्रवेश केला आहे. दुसरा क्लासिकल गेम जिंकून त्यानं सहा गुणांची आघाडी घेतली आहे. आता त्याची गाठ अमेरिकेच्या फॅबियानो कारुआना याच्याशी पडेल.

<><><><>

भारत आणि श्रीलंका यांच्यात कोलंबो इथं सुरू असलेल्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात आज चौथ्या दिवशी श्रीलंकेचा डाव २९० धावांवर संपला. त्यामुळे भारतानं त्यांना फॉलो ऑन दिला. काल दिवसअखेर श्रीलंकेच्या ८ बाद २६५ धावा झाल्या होत्या. फॉलो ऑन टाळण्यासाठी त्यांना ३९ धावांची गरज होती. मात्र, आज अवघ्या २५ धावात त्यांचा डाव आटोपला. प्रसिद्ध कृष्णा आणि मानव सुतार यांनी प्रत्येकी ३ गडी बाद केले.

चहापानापर्यंत श्रीलंकेच्या दुसऱ्या डावात ३ बाद १९९ धावा झाल्या होत्या.

<><><><>

बीडमधल्या एका बंद हॉटेलमध्ये चाललेल्या जुगाराच्या अड्ड्यावर पोलिसांनी छापा टाकून रोख रक्कम,मोबाईल फोन्स आणि वाहन असा एकंदर सुमारे साडे आठ लाखाचा मुद्देमाल जप्त केला. यासंदर्भात १२ लोकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आल्याचं पोलिसांनी सांगितलं.

<><><><>

नांदेड जिल्ह्यात एका पाच वर्षांच्या मुलीवर बलात्कार केल्याप्रकरणी आरोपीला परभणीतून अटक करण्यात आली आहे. आरोपीनं पीडितेला चॉकलेटचं आमिष दाखवून तिच्यावर बळजबरी केल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. घटनेनंतर आरोपी फरार झाला होता. त्याला पोलिसांनी परभणीत पालम तालुक्यातून अटक केली. आरोपीवर पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

//<><><><><>//